आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
११ सप्टेंबर २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- जगभरात व्यापारातले अडथळे वाढत असताना भारत आर्थिक सेतू बांधत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन / 'ब्रिक्स' शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध जागतिक नेत्यांशी केली द्विपक्षीय चर्चा

- आखाती देशांकडून होणाऱ्या जागतिक तेल पुरवठ्यात प्रतिदिन ५७ लाख बॅरल घट होण्याची शक्यता

- भारताचा परकीय चलन साठा ७८५ अब्ज ७० कोटी अमेरिकी डॉलर्सवर

- नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू, ९ जण गंभीर जखमी

**आणि**

- कनिष्ठ गट आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारत अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

जगभरात व्यापार क्षेत्रातले अडथळे वाढत असताना भारत आर्थिक सेतू बांधत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. ऊर्जाक्षेत्र ते तंत्रज्ञानापासून पुरवठा साखळ्या वैविध्यपूर्ण आणि विश्वासार्ह करायचं काम भारतानं केलं, त्यामुळेच जागतिक अनिश्चिततेल्या काळात प्रगती आणि स्थैर्याचा विश्वास इथं आहे, असं ते म्हणाले. नवी दिल्लीत ब्रिक्स व्यापार मंचाला ते संबोधित करत होते. ब्रिक्सचे सदस्य देश आणि भागीदार देशांमध्ये नवोन्मेष आणि तंत्रज्ञान क्षेत्रातली देवाणघेवाण वाढवावी, असं आवाहन त्यांनी केलं. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या स्थितीवरही त्यांनी भाष्य केलं.

***होल्ड... प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

जागतिक व्यवस्थेतले अडथळे कमी करणं आणि व्यापारासाठी संधी निर्माण करणं हाच ब्रिक्स संघटनेप्रति भारताचा दृष्टिकोन असून त्यादृष्टीनं अनेक पावलं उचलल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला आणि याचा लाभ घ्यायचं आवाहन सर्व सदस्य देशांना केलं. ब्रिक्स संघटना तिसऱ्या दशकात प्रवेश करत असताना व्यापार क्षेत्रातले सर्वात मोठे १० अडथळे दूर करण्यासाठी अहवाल तयार करणं, दर वर्षी १०० स्टार्टअप्सना इतर ब्रिक्स सदस्य देशांच्या बाजारपेठांमध्ये घेऊन जायला मदत करणं, तसंच १००० नव्या भागीदारीच्या संधी तयार करणं असे उपाय मोदी यांनी सुचवले. देशानं स्टार्टअप्स, पायाभूत सुविधा, यूपीआय इत्यादी क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला.ब्रिक्स अर्थव्यवस्थांच्या पाठीचा कणा असलेल्या सर्वांपर्यंत या भागीदारीचे लाभ पोहोचवण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याची ग्वाही केंद्रीय उद्योग आणि वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांनी दिली. याचा फायदा शेतकरी, महिला व्यावसायिक, युवा उद्योजक आणि छोट्या उद्योगांना व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान, दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा आणि इतरांनीही या मंचाला संबोधित केलं.

दरम्यान, भारताच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं उद्यापासून सुरु होत असलेल्या १८ व्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेसाठी जगभरातले विविध नेते एकत्र येणार आहेत.

<><><><><>

ब्रिक्स परिषदेच्या निमित्तानं भारतात आलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज द्विपक्षीय चर्चा केली. पश्चिम आशिया आणि काळ्या समुद्रातला संघर्ष, यामुद्यांसह विविध बाबींवर दोन्ही नेत्यांनी सहकार्याची भूमिका घेतली आहे. भारतात रशियानं  भरवलेलल्या इनोप्रॉम या आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनाला त्यांनी सोबतच भेट दिली. २४व्या भारत-

रशिया वार्षिक शिखर संमेलनाचं  पुतीन यांनी दिलेलं आमंत्रण प्रधानमंत्री मोदी यांनी स्वीकारलं असून दोन्ही पक्षांच्या सोयीने त्याच्या तारखा निश्चित केल्या जातील. प्राचीन तमिळ कवी तिरुवल्लुवर यांच्या तिरुक्कल या महाकाव्याची अनुवादित प्रत मोदी यांनी पुतीन यांना भेट म्हणून दिली. इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान, तसंच संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांच्याशीही प्रधानमंत्री मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. दरम्यान, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फतह अल सिसी, इथियोपियाचे प्रधानमंत्री अबिय अहमद अली, मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम, अबुधाबीचे युवराज शेख खालेद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान नायजेरियाचे उपाध्यक्ष काशिम शेट्टीमा यांच्यासह इतर नेत्यांचं ब्रिक्स परिषदेसाठी नवी दिल्लीत आगमन होत आहे.

**<><><><><>**

सुरक्षा आणि ग्राहकहिताकडे दुर्लक्ष न करता नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचं आवाहन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज केलं. त्या आज मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टच्या समारोप सत्रात बोलत होत्या. कृत्रिम बुद्धिमत्ता ही दुधारी तलवार असून, तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग कमी न करताना सुरक्षेची काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. देशाची लोकसंख्या हे आव्हानं म्हणून नव्हे तर संधी म्हणून समोर येत असल्याचं त्या म्हणाल्या. या परिषदेत फास्टॅगसाठी वनटॅग सुविधेचं उद्घाटन आज केंद्रीय महामार्ग आणि रस्तेवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं. या सुविधामुळे, बँकखातं बदललं तरी फास्टॅग सुविधा सहजतेने नव्या खात्याशी जोडता येणार आहे.  या आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत टोलनाक्यांवर थांबण्याचा वेळ १० सेकंदांपेक्षा कमी होऊ शकेल असं गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आखाती देशांकडून होणारा तेलाचा पुरवठा २०२७पर्यंत पूर्ववत होण्याची शक्यता मावळल्यानं जागतिक पातळीवर या पुरवठ्यात ५७ लाख बॅरल प्रति दिवस इतकी घट होऊन तो १० कोटी ७ लाख बॅरल प्रति दिन इतका होण्याची शक्यता आहे. आखाती प्रदेशातल्या धोक्यामुळे १ कोटी बॅरल प्रति दिन इतका पुरवठा बंद राहिल्यानं जागतिक तेल उत्पादनात ऑगस्ट महिन्यात १६ लाख बॅरल प्रति दिवस इतकी घट झाली.

<><><><>

भारताच्या परकीय चलनसाठ्यात गेल्या आठवड्यात ४४ अब्ज ९० कोटी अमेरिकी डॉलर्सची वाढ झाली आणि तो ७८५ अब्ज ७० कोटी अमेरिकी डॉलर्सच्या नव्या उंचीवर पोहोचला. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीत ही माहिती दिली आहे. आधीच्या आठवड्यातही परकीय चलनसाठ्यात ११ अब्ज ४७ कोटी डॉलरची वाढ होऊन तो ७४० अब्ज ८० कोटी डॉलर इतका झाला होता.

<><><><>

भंडारा जिल्ह्यात नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्गावर पिंपळगाव सडक परिसरात आज पहाटे एका पिकअप व्हॅनची ट्रकला धडक बसल्यानं झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, तर ९ जण गंभीर जखमी झाले. हे सर्व प्रवासी छत्तीसगढमधले होते आणि धार्मिक कार्यासाठी नागपूरकडे चालले होते. अपघातात ८ जण जागीच ठार झाले, तर एका महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृतांपैकी दोघांची ओळख अद्याप पटलेली नाही. जखमींना रुग्णालयात दाखल केलं असून, पोलीस तपास सुरु आहे.

<><><><>

कनिष्ठ गट आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय मुलांच्या संघानं अंतिम सामन्यात स्थान निश्चित केलं आहे. चीनमध्ये मोकी इथं आज झालेल्या उपांत्य सामन्यात

त्यांनी मलेशियाचा ३-१ नं पराभव केला. कर्णधार अनमोल एक्कानं दोन, तर सुखविंदरनं दोन गोल केले.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत आज रात्री उशिरा अग्रमानांकित अलेक्झांडर झ्वेरेव्हचा सामना कॅरेन खचानोव्हशी होणार आहे. तर दुसऱ्या सामन्यात बेन शेल्टनसमोर फ्रान्सिस टियाफोचं आव्हान असेल. महिला एकेरीच्या उपांत्य सामन्यात एलेना रिबाकीनानं कोको गॉफवर मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला, तर दुसऱ्या सामन्यात अग्रमानांकित अरीना साबालेंकानं जेसिका पेगुलाचा थेट सेट्समध्ये पराभव करून अंतिम फेरीतलं स्थान निश्चित केलं. अजिंक्यपदासाठी त्यांची लढत उद्या होणार आहे.

<><><><><>

यूरोपियन आयोगाने आज भारताबरोबर मुक्त व्यापार करार करण्याबाबतचा प्रस्ताव युरोपियन परिषदेकडे सादर केला. परिषदेने या कराराला मंजुरी दिली तर हा करार युरोपियन महासंघ आणि भारत यांच्यातला आतापर्यंतचा सर्वात मोठा व्यापार करार ठरेल. हा करार अंमलात आला तर त्यामुळे बाजारपेठेतली उपलब्धता वाढेल, आयात शुल्कात कपात होईल, व्यापारातले अनावश्यक अडथळे दूर होतील आणि युरोपियन महासंघ आणि भारत यांच्यात व्यापार आणि गुंतवणुकीसाठी निश्चित आणि स्पष्ट नियम उपलब्ध होतील, असं युरोपियन आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या करारामुळे भारतात होणाऱ्या युरोपियन महासंघाच्या ९६ टक्के वस्तूंच्या निर्यातीवरचं आयात शुल्क रद्द किंवा कमी केलं जाईल; या शुल्क कपातीमुळे युरोपियन उत्पादनांवरच्या करापोटी दरवर्षी सुमारे ४ अब्ज युरोची बचत होण्याची अपेक्षा आहे. युरोपियन परिषदेच्या मंजुरीनंतर, कराराची अंमलबजावणी करण्यापूर्वी अंतिम मसुद्याला युरोपियन संसदेची मंजुरी घेणं आवश्यक असेल.

//<><><><><>//